# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 17/07/2021 (शनिवार)
(दुपार)

---

### अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. काटोल :– दिनांक 16/07/2021 चे 19:55 वा. ते 20.20 वा. दरम्यान मृतक नामे– अजय वंसतराव लोही, वय 52 वर्ष, रा. पेठबुधवार काटोल हे एमएच– 40/एफ– 0316 क्रमांकाच्या मोटरसायकलने डबलसीट काटोल नाक्याकडून काटोलकडे जात असता मागून येणा–या अज्ञात चारचाकी वाहनाचे चालक आरोपीने आपले ताब्यातील वाहन अतिशय भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून मृतकाचे मोटरसायकला धडक दिली. या अपघातात अजय लोही याचा मृत्यु झाला. तर मित्र विजय अरसडे हा गंभीर जखमी झाला व सदर वाहन चालक आरोपी न थांबता आपले वाहन घेवून पळून गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राजीव वंसतराव लोही वय 50 वर्ष, रा. पेठबुधवार काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो. स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 134, 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक श्री संतोष आंधळे 8380833424 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कोंढाळी :– दिनांक 15/07/2021 चे 17:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अकिल अजिम चिंदे वय 31 वर्ष रा जुन्या कोर्ट जवळ, वार्ड क्र. 9 वाडा ता. वाडा जि. पालघर व आरोपी/मृतक नामे– रविश असमद भूरे, वय 55 वर्ष, रा. वडोली ता. वाडा जि. पालधर हे दोघोही आरोपीच्या एमएच– 05/डीके– 3003 क्रमांकाचा अशोक लेलॅड कंपनीच्या गाडीने रायपूर ते मुंबई जात होते. त्यादरम्यान पोस्टे कोंढाळी हददीतील मौजा जुनापानी शिवारात गाय आडवी आल्याने गायीला व बाजूचे गाडीला वाचविण्याचे प्रयत्नात गाडीचा तोल गेल्याने व गाडीचालक याचे गाडीवरिल नियंत्रण सुटल्याने गाडी रोडच्या खाली उलटली. या अपघातात आरोपी याने त्याचे ताब्यातील एमएच– 05/डीके– 3003 क्रमांकाचा अशोक लेलॅड कंपनीची गाडी भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून स्वतः जखमी होवून स्वतःचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री ठाकरे 8888157262 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर